


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७६ वे/अंक ११२ वा ■ ■ अमरावती, मंगळवार,दिनांक ९ डिसेंबर २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १९ मार्गशिर्ष १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■




## मुस्लिम लीग, नेहरु, वंदे मातरम् राष्ट्रगानाच्या चर्चे दरम्यान मोदींचे कॉंग्रेसवर मोठे आरोप



नवी दिल्ली दि. ८ : वंदे मातरम् या राष्ट्रगानाला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आज लोकसभेमध्ये चर्चा होत आहे. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाने या चर्चेला सुरुवात झालीय. वंदे मातरम् या राष्ट्रगानाला १५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक क्षणाचे आपण साक्षीदार आहोत, ही गर्वाची बाब आहे. मी सर्वांचे आभार मानतो. या महत्वपूर्ण प्रसंगी सामूहिक चर्चेचा मार्ग निवडला. ज्या मंत्राने, जयघोषाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या आंदोलनाल ऊर्जा, प्रेरणा दिली, त्याग आणि तपस्येचा मार्ग दाखवला, त्या वंदे मातरम् च स्मरण करणं हे आपल्या सर्वांच सौभाग्य आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. वंदे मातरम् चा १५० वर्षांचा प्रवास अनेक टप्प्यांवरुन गेला आहे. वंदे मातरम् ला ५० वर्ष झाली, तेव्हा देश गुलामीमध्ये होता. ज्यावेळी वंदे मातरम् ला १०० वर्ष पूर्ण झाली, तेव्हा आणीबाणी लागलेली. वंदे मातरम् साठी अत्यंत उत्तम पर्व पाहिजे, तेव्हा संविधानाचा गळा घोटलेला असं पीएम मोदी म्हणाले.

ज्यावेळी वंदे मातरम् ला १०० वर्ष झाली, त्यावेळी देशभक्तीसाठी जगणारे-मरणाऱ्या लोकांना तुरुंगात टाकलं होतं. ज्या वंदे मातरम् गीताने देशाच्या स्वातंत्र्याला ऊर्जा दिली. त्याला १०० वर्ष पूर्ण होताना आमच्या इतिहासाचा *(पान २ वर)*

## वेगळ्या विदर्भाच्या बाजूनेच भाजपची भूमिका आम्ही त्यावर काम करतोय : चंद्रशेखर बावनकुळे



नागपूर दि. ८ : विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून नागपुरात सुरुवात झाली आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर वेगळ्या विदर्भाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेते व माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी केली आहे. यामुळं राजकारण चांगलच तापलं आहे. यावर भाजपचे नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूमिका सष्ट केली आहे. वेगळ्या विदर्भाबाबत आमची भूमिका कायम आहे. यावर आम्ही काम करत आहोत असल्याचं वक्तव्य राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. ते एबीपी माझाच्या माझा महाराष्ट्र माझं व्हिजन या कार्यक्रमात बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील आजवर वेगळ्या विदर्भाबाबतच भूमिका मांडली असल्याचे बावनकुळे म्हणाले. काँग्रेसने विचारलेल्या विदर्भाच्या मुद्द्यावर उत्तर देताना आमचा वेगळ्या विदर्भाचा अजेंडा कायम असल्याचं चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे.

**भाजपची भूमिका वेगळ्या विदर्भाच्या बाजूची**

वेगळ्या विदर्भाचा मुद्दा कांग्रेस पार्टी आता काढत आहे, मात्र हा मुद्दा आमचा आहे. भाजपच्या अजेंडाचा मुद्दा आहे. भाजपच्या अजेंडातून हा मुद्दा बाहेर गेलेला *(उर्वरित पान २ वर)*

## वेगळा विदर्भ झालाच पाहिजे : वडेट्टीवार



मुंबई दि. ८ : वेगळा विदर्भ झाल्याशिवाय विदर्भाचा विकासाचा अनुशेष भरुन काढणे शक्य नाही. त्यामुळे भविष्यात वेगळा विदर्भ झालाच पाहिजे, असे वक्तव्य काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केले. वेगळा विदर्भ आम्हाला हवाय कारण आताच्या सामाजिक समीकरणानुसार विदर्भात ओबीसी, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांचं प्राबल्य राहिले आहे. विदर्भात मिश्र समाज आहे. या समाजांच्या दृष्टीकोनातून आपण पाहिलं तर या लोकांना सत्तेत फार कमी संधी मिळाली आहे. जोपर्यंत सत्तेत सहभागी होत नाही, तोपर्यंत त्या *(पान २ वर)*

## मोदी तुम्ही १२ वर्ष पीएम आहात, तेवढी वर्ष नेहरू जेलमध्ये होते; त्यांच्या चुकांची यादी करा, चर्चा करू, सरकार देशाचें वास्तव लपवतंय : प्रियंका गांधी



नवी दिल्ली दि. ८ : वंदे मातरमवरील चर्चा करण्याचे मुख्य कारण म्हणजे बंगालची निवडणूक येत आहे. ज्यांनी स्वातंत्र्याची लढाई लढली आणि देशासाठी कुर्बान्या दिल्या, त्यांच्यावर नवीन आरोप लादण्याची संधी सरकारला हवी आहे. या चर्चेचा उद्देश फक्त जनतेचे लक्ष त्यांच्या ज्वलंत समस्यांवरून विचलित करण्यावर असल्याचा हल्लाबोल खासदार प्रियांका गांधी यांनी केला. प्रियांका गांधी यांनी मोदींच्या भाषणाचा समाचार घेतला.

प्रियांका म्हणाल्या की, सरकार वर्तमान आणि *(उर्वरित पान २ वर)*

## ७ देश आमने-सामने, थेट हल्ल्यांना सुरुवात, युद्धामुळे जगभरात खळबळ

नवी दिल्ली दि. ८ : या वर्षी जगानं अनेक युद्ध पाहिले, इस्त्रायल आणि इराणमध्ये भीषण युद्ध झालं, ज्यामध्ये दोन्ही देशांचं प्रचंड नुकसान झालं आहे. मोठ्या प्रमाणात जिवीत आणि वित्तहानी झाली. त्यानंतर गाझा आणि इस्त्रायमध्ये देखील युद्ध सुरू होतं, अखेर अमेरिकेच्या मध्यस्थीने युद्धविराम घडून आणला गेला. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये देखील चांगलाच संघर्ष निर्माण झाला होता. दरम्यान त्यानंतर आता मोठी बातमी समोर येत आहे, जगामध्ये कोणत्याही क्षणी युद्धाचा भडका उडू शकतो अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. आशिया खंडामधील तब्बल सात देश आमने-सामने आले आहेत, त्यामुळे तणाव वाढला असून, संपूर्ण जगाचं लक्ष या सात देशांकडे लागलं आहे. जर या देशांमध्ये युद्धाला सुरुवात झाली तर *(उर्वरित पान २ वर)*

## एमपीएससी ने २१ डिसेंबरची पूर्व परीक्षा पुढे ढकलली

मुंबई दि. ८ : राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४८ नगरपंचायती निवडणुकीच्या मतमोजणीमुळे २१ डिसेंबर रोजीची एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सर्वच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, नव्याने परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या असून ४ जानेवारी आणि ११ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होणार आहे. महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा *(उर्वरित पान २ वर)*

## शिवसेनेचे २२ आमदार भाजपच्या गळाला : आदित्य ठाकरे



मुंबई दि. ८ : शिंदे गटातील २२ आमदार भाजपमध्ये जाणार असल्याचा दावा ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरेंनी केला. आदित्य ठाकरेंच्या दाव्यामुळे राज्यातील राजकरणात मोठा भूकंप होणार असल्याची चर्चा जोरात सुरू झाली आहे. विधानसभेत विरोधी पक्षनेता निवडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू झालेत. त्यावर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर टीका केलीय. यावेळी त्यांनी मोठा गौप्यस्फोट केलाय. नागपूर हिवाळी अधिवेशनात पत्रकारांशी ते बोलत होते.

विरोधी पक्षनेत्याच्या प्रस्तावात कुठलाही बदल झाला नाहीये, त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नका. ही बातमी कुणी पेरलीय, कधी पेरली, कुठच्या माणसाने पेरली हे माहिती आहे. तसेच सत्ताधारी एका पक्षात *(पान २ वर)*

## शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार भाजपात घेऊन काय करायचे? ते आमचेच : मुख्यमंत्री फडणवीस



नागपूर दि. ८ : राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरूवात झाली आहे. या अधिवेशनात राज्यातील विविध मुद्यांवरून सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने येण्याची शक्यता आहे. अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या मदतीवरून विरोधक सरकारला घेरण्याची शक्यता आहे. मात्र, असं असतानाच अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आणि त्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

'एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे २२ आमदार भाजपाच्या गळाला लागले आहेत', असं वक्तव्य आदित्य ठाकरे यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर देत जोरदार टीका केली आहे. पण यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणखी एक मोठं वक्तव्य केलं आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे *(उर्वरित पान २ वर)*

## ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांचे निधन



पुणे दि. ८ : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी आणि कामगार नेते बाबा आढाव यांचे आज रात्री ८ वाजून २५ मिनिटांनी निधन झाले, ते ९५ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून ते आजार होते, त्यांतच त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वीच, शरद पवार हे बाबा आढावांच्या भेटीला रुग्णालयात गेले होते. पुना हॉस्पिटलमध्ये बाबा आढाव यांच्यावर उपचार सुरु असताना त्यांनी रुग्णालयात जाऊन विचारपूस केली होती. तर, गेल्याच आठवड्यात ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांचे निधन झाले होते. तेव्हाही शरद पवारांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पन्नालाल सुराणा यांच्या कार्याची आठवण काढत त्यांना आदरांजली वाहिली होती.

**कोण आहेत बाबा आढाव?**

१९७० च्या दशकात डॉ. बाबा आढाव पुणे महापालिकेचे नगरसेवक *(उर्वरित पान २ वर)*

### माहोल....




कधी सुरू करतील हे लोकं कांड? तेव्हा मज्ञा येते यार टीव्हीसमोर बसून बघायची अधिवेशन!







